01 NOV 2026
सकाळ



कोल्हापूर : झेक प्रजासत्ताकच्या रिसर्च सेंटरचे संचालक विट डोकल यांचे शिवाजी विद्यापीठात स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. शेजारी डावीकडून डॉ. आसावरी जाधव, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि ललित पाटील.

झेक प्रजासत्ताकच्या शिष्टमंडळाची विद्यापीठाला भेट

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर,ता. ३१ : झेक प्रजासत्ताकच्या इंटरनॅशनल न्यूरोडिजेनेरेटिव्ह डिसऑर्डर रिसर्च सेंटरच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने शिवाजी विद्यापीठाला भेट देऊन संशोधनातील आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संधींबाबत चर्चा केली.

झेक प्रजासत्ताक येथील इंटरनॅशनल न्यूरोडीजेनेरेटिव्ह डिसऑर्डर रिसर्च सेंटरचे संचालक विट डोकल आणि संस्थेचे एथिक्स अँड सिक्युरिटी मॅनेजर ललित पाटील यांनी भेट दिली.

कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासमवेत त्यांनी संशोधन क्षेत्रातील परस्पर सहकार्य, संस्थात्मक समन्वय आणि भविष्यातील सहकार्याच्या संभाव्य दिशांवर विचारविनिमय केला.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, 'आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांसमवेत संवाद वाढविणे आणि विविध शैक्षणिक क्षेत्रांतील कौशल्यांचा परस्परपूरक उपयोग करण्याचे शिवाजी विद्यापीठाचे धोरण आहे. त्या दृष्टीने या संवादाला महत्त्व आहे.' पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत केले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे उपस्थित होते. डॉ. सोनल चोंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 NOV 2026 सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मोटारसायकल रॅलीला शुभेच्छा देताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. शेजारी कर्नल विक्रम नलवडे, केतन चव्हाण, अश्वीन शिंदे, प्रशांत काशीद, डॉ. नचिकेत पाटील आदी.

पर्यटनाला चालना देणारा उपक्रम स्तुत्य

कुलगुरू डॉ. कामत : विद्यापीठात मोटारसायकल रॅलीचे उद्घाटन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : 'पर्यटन वाढीला चालना देणाऱ्या फोर बाय फोर कोल्हापूर स्पोर्टस् क्लबचा उपक्रम स्त्युत्य आहे,' असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले.

'रेड मड फोर बाय फोर ऑफ-रोड चॅलेंज'तर्फे गगनबावडा मोटारसायकल रॅली आज शिवाजी विद्यापीठातून मार्गस्थ झाली. ही रॅली ३१ ऑक्टोबर ते एक नोव्हेंबरदरम्यान होत असून, ही फक्त मोटारसायकल रॅली नसून १६ रोजी होणाऱ्या नेपाळ 'बाईक एक्सपीडिशनची ट्रायल राईड' आहे. या माध्यमातून रायडर्सची बाईक, रायडिंग स्किल्स, टीम को-ऑर्डिनेशन आणि सहनशक्तीची चाचणी होणार आहे.

आज पहाटे पुण्यातून याला सुरुवात झाली. गगनबावड्याच्या हिरव्यागार सह्याद्री आणि निसर्गाचा अनुभव रायडर्स घेत आहेत. दुसऱ्या दिवशी सनराईज राईड, फोटोग्राफी सेशन आणि गगनबावडा परिसरातील छोटी राईड करून परतीचा प्रवास सुरू होईल. उद्या सकाळी न्यू पॅलेस येथे भेट होऊन सर्व जण परतीच्या प्रवासाला लागतील.

दरम्यान, दसरा चौक येथे रॅलीचे स्वागत 'भाजप'चे कृष्णराज महाडिक यांनी केले. यावेळी कोल्हापूर स्पोर्टस् क्लबचे प्रशांत काशीद म्हणाले, 'पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने ही रॅली आयोजित केली आहे. यावेळी अश्विन शिंदे, प्रकाश मुजूमदार, नितीन जोशी, प्रवीण जवळकर, डॉ. नचिकेत पाटील, कर्नल विक्रम नलवडे, कोल्हापूर स्पोर्टस् क्लबचे अध्यक्ष केतन चव्हाण, विनायक शिंदे, पल्लवी यादव, कुणाल धुम्मा, कृष्णकांत जाधव, दिग्विजय लोळगे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 1 NOV 2026 जनप्रवास



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सरदार पटेल, इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदी.

सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

जनप्रवास : कोल्हापूर

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. प्रमोद कसबे यांनी उपस्थितांना शपथ प्रदान केली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरण कुमार शर्मा, रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेलचे समन्वयक डॉ. तुकाराम डोंगळे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. संतोष सुतार, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुर्यबाला सावंत, डॉ. देवश्री पाटील, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. स्नेहा पाटील, डॉ. योजना पाटील, डॉ. तेजस्विनी भट आदी उपस्थित होते.

0 1 NOV 2026

पुढारी

सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. आर. के. कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते सरदार पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यानंतर उपस्थितांना एकता व सद्भावनेची डॉ. प्रमोद कसबे यांनी शपथ दिली. कार्यक्रमातून राष्ट्रीय एकात्मता, एकता आणि सामाजिक सद्भावनेचा संदेश देण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

0 1 NOV 2026

सकाळ

सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिनानिमित्ताने त्यांच्या स्मृतींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय इमारतीत सकाळी सरदार पटेल, इंदिराजींच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. आर. के. कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. सर्व उपस्थितांनी एकता व सद्भावना यांची शपथ घेतली. डॉ. प्रमोद कसबे यांनी शपथ प्रदान केली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरण कुमार शर्मा, रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेलचे समन्वयक डॉ. तुकाराम डोंगळे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. संतोष सुतार, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सूर्यबाला सावंत, डॉ. देवश्री पाटील, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. स्नेहा पाटील, डॉ. योजना पाटील, डॉ. तेजस्विनी भट आदी उपस्थित होते.

0 1 NOV 2026
पुण्यनगरी

सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : प्रतिनिधी

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन या निमित्ताने त्यांच्या स्मृतींना शनिवारी शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी सरदार पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी उपस्थितांनी एकता व सद्भावना यांची शपथ घेतली. डॉ. प्रमोद कसबे यांनी शपथ प्रदान केली.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरण कुमार शर्मा, रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेलचे समन्वयक डॉ. तुकाराम डोंगळे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. संतोष सुत्तार, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सूर्यबाला सावंत, डॉ. देवश्री पाटील, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. स्नेहा पाटील, डॉ. योजना पाटील, डॉ. तेजस्विनी भट आदी उपस्थित होते.

0 1 NOV 2026
लोकमत

सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना अभिवादन

कोल्हापूर : सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात शनिवारी अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
01 NOV 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डिजिटल युगात शिक्षणाच्या नव्या संधी

- प्र. कुलगुरु डॉ. ज्योती जाधव यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर

डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणाच्या नव्या संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे, प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी प्रतिपादन केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने ऑनलाइन एम.बी.ए., ऑनलाइन एम.कॉम. आणि ऑनलाइन एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांच्या नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग मार्गदर्शन तत्वानुसार तीन दिवसीय 'दीक्षारंभ – विद्यार्थी उद्‌बोधन कार्यक्रम २०२६–२७' आयोजित केला. त्यावेळी त्या



प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

डॉ. जाधव म्हणाल्या, पारंपरिक वर्गाधारित शिक्षणापासून आधुनिक ऑनलाइन अध्यापन-अध्ययन पद्धतीकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. शिक्षण, विद्यार्थ्यांची प्रतिभा, कौशल्य विकास आणि मानवी मूल्ये यांचा सुंदर संगम या उपक्रमातून मिळतोय ही अभिनंदनीय गोष्ट आहे. केवळ पदवी संपादन न करता व्यावहारिक ज्ञान, नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि व्यावसायिक नैतिकता विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. आजच्या काळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार कौशल्याधारित व गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्वाचे आहे.

डॉ. केदार मारुळकर यांनी ऑनलाइन शिक्षणाचे चार चतुष्कोन या विषयावर मार्गदर्शन केले.

तिसऱ्या दिवशी बहाई अकादमी, पाचगणीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी व कार्यक्रम समन्वयक पराग टंडले यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील व्यावसायिक उत्कृष्टता, नैतिक विकास आणि मानवी मूल्यांसाठी शिक्षण' या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले. संचालक डॉ. पी. एस. पाटणकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ.नगिना माळी आणि प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. दयानंद गवाडे यांनी आभार मानले.

0 1 NOV 2026

पुढारी

डिजिटल शिक्षणातून विद्यार्थ्यांना नव्या संधी : डॉ. ज्योती जाधव

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षणाच्या नव्या संधी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होत आहेत. ऑनलाईन शिक्षणातून कौशल्य विकासाला चालना मिळत आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे ऑनलाईन एमबीए, एमकॉम व एमएस्सी (गणित) अभ्यासक्रमांच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी तीनदिवसीय 'दीक्षारंभ-विद्यार्थी उद्‌बोधन कार्यक्रम २०२६-२७' आयोजित करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त, वेळेचे नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास व तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले. संचालक प्रा. डॉ. पी. एस. पाटणकर यांनी प्रास्ताविक केले. दुसऱ्या दिवशी डॉ. केदार मारुळकर, तर तिसऱ्या दिवशी पराग टंडले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नंगिना माळी यांनी केले. प्रियांका सुर्वे यांनी आभार मानले.

01 NOV 2026
सकाळ

डिजिटल युगात नव्या संधी : डॉ. जाधव

कोल्हापूर, ता. ३१ : 'डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणाच्या नव्या संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहेत,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे ऑनलाईन एम.बी.ए., ऑनलाईन एम.कॉम. आणि ऑनलाईन एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांच्या नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग मार्गदर्शन तत्त्वानुसार तीनदिवसीय दीक्षारंभ विद्यार्थी उद्‌बोधन कार्यक्रम झाला. डॉ. जाधव म्हणाल्या, 'पारंपरिक वर्गाधारित शिक्षणापासून आधुनिक ऑनलाईन अध्यापन-अध्ययन पद्धतीकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. शिक्षण, विद्यार्थ्यांची प्रतिभा, कौशल्य विकास आणि मानवी मूल्यांचा संगम या उपक्रमातून मिळतोय. विद्यार्थ्यांनी केवळ नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि व्यावसायिक नैतिकता विकसितवर भर दिला पाहिजे.'


डॉ. ज्योती जाधव

संचालक प्रा. डॉ. पी. एस. पाटणकर यांनी स्वागत केले. डॉ. नगिना माळी, प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन, तर दयानंद गवाडे यांनी आभार मानले.

दुसऱ्या दिवशी प्रमुख डॉ. केदार व्ही. मारुळकर यांनी 'ऑनलाईन शिक्षणाचे चार चतुष्कोन यावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी बहाई अकादमी पाचगणीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी पराग टंडले यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील व्यावसायिक उत्कृष्टता, नैतिक विकास आणि मानवी मूल्यांसाठी शिक्षण' यावर माहिती दिली.

0 1 NOV 2026
सकाळ

'दृष्टिहीन महिलांसाठी तंत्रज्ञान' कार्यशाळेला प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्रातर्फे दृष्टिहीन महिलांसाठी तंत्रज्ञान यावरील कार्यशाळेला प्रतिसाद मिळाला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. दूरशिक्षण केंद्र संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी डॉ. शिंदे यांनी 'दृष्टी दिव्यांग महिलांसाठी विकास धोरण' यावर व्याख्यान दिले. संतोष परीट यांनी 'दृष्टिहीन महिलांच्या जीवनात तंत्रज्ञानाचे महत्त्व' यावर विचार मांडले. दुसऱ्या सत्रात नॅबचे उपाध्यक्ष उदय माने यांनी 'दृष्टिहीन महिलांची सुरक्षा व त्यासाठीच्या उपाययोजना' यावर तर स्कूल ऑफ नॅनोसायन्सचे डॉ. प्रमोद पाटील यांनी 'दैनंदिन जीवनात प्राणायामाचे महत्त्व' आणि डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंशिस्त व शी टॉक उपक्रमांतर्गत दृष्टिहीन महिलांशी संवाद' यावर मार्गदर्शन केले. उपस्थित सर्व दृष्टी दिव्यांग महिलांनी विद्यापीठात पी. एम. उषा योजनेंतर्गत सुरू असलेल्या चॉकलेट प्रकल्पाला भेट दिली. कल्याणी माने यांनी सूत्रसंचालन केले. सतीश नवले यांनी आभार मानले.

01 NOV 2026

पुढारी

दृष्टिहीन महिलांसाठी तंत्रज्ञानाचे धडे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज व समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या वतीने 'दृष्टिहीन महिलांसाठी तंत्रज्ञान' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेस दृष्टिदिव्यांग महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याप्रसंगी दूरशिक्षण केंद्राच्या संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर प्रमुख उपस्थित होत्या. संतोष परीट यांनी तंत्रज्ञानाचे महत्त्व विशद केले. दुसऱ्या सत्रात उदय माने यांनी महिलांची सुरक्षा, डॉ. प्रमोद पाटील यांनी प्राणायामचे महत्त्व तर डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वयंशिस्त व 'शी टॉक' उपक्रमाबाबत मार्गदर्शन केले. कल्याणी माने यांनी सूत्रसंचालन केले. सतीश नवले यांनी आभार मानले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 1 NOV 2026 सकाळ

पुरुषोत्तम करंडक स्पर्धेला रसिकांचा प्रतिसाद

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशीही आज रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात ही स्पर्धा सुरू आहे. महाराष्ट्रीय कलोपासक (पुणे), गायन समाज देवल क्लब आणि शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे संयोजन आहे. दरम्यान, उद्या (रविवारी) सकाळच्या सत्रात तीन एकांकिका सादर होणार असून, सायंकाळी पाच वाजता कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे.



कोल्हापूर : अंशोकराव माने पॉलिटेक्निकने शनिवारी सादर केलेल्या 'वाघ आला वाघ' एकांकिकेतील एक प्रसंग.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे आर्किटेक्चर महाविद्यालयाची 'नकाब', देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सची 'शाब्बास पट्ठे', सदगुरू गाडगे महाराज कॉलेजची 'छप्पर', राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाची 'ओएसिस', व्यंकटेश महाविद्यालयाची 'द अनसीन व्हिजन', अशोकराव माने पॉलिटेक्निकची 'वाघ आला वाघ', शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाची 'मागचं दार', भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाची 'साठी' आणि डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटची 'आभास' या एकांकिका दिवसभरात सादर झाल्या.

उद्या (रविवारी) सकाळी नऊ वाजता केआयटी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एज्युकेशन अँड रिसर्चची 'सहेला', स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीची 'बीफोर द ट्रिगर' आणि नांगठाणेच्या आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजची 'पैरा' या एकांकिका सादर होणार आहेत.

01 NOV 2026
लोकमत



कोल्हापुरात देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात शनिवारी अशोकराव माने पॉलिटेक्निकच्या कलाकारांनी 'वाघ आला वाघ' एकांकिका सादर केली.

तेरा एकांकिकांत रंगली चुरस; करंडकचा मानकरी ठरणार आज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नाट्यप्रेमींचे लक्ष लागून राहिलेल्या पुरुषोत्तम करंडकासाठी महाविद्यालयीन संघांमध्ये चुरस रंगली आहे. एकाहून एक सरस संहिता, दमदार अभिनय आणि कल्पक सादरीकरणाने स्पर्धेचा दुसरा दिवस गाजला. आता अंतिम तीन एकांकिकांच्या सादरीकरणानंतर आज, रविवारी सायंकाळी मानाचा करंडक कोण पटकावणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली.

महाराष्ट्रातील कलोपासक, पुणे; गायन समाज देवल क्लब व शिवाजी विद्यापीठातर्फे देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात ही स्पर्धा सुरू आहे. शुक्रवारी आणि शनिवारी विविध महाविद्यालयांतील कलाकारांनी तेरा एकांकिकांचे दमदार सादरीकरण केले. दरम्यान, आज सकाळच्या सत्रात के.आय.टी.ची 'सहेला', स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीची 'बिफोर द ट्रिगर' आणि नागावणेच्या महाविद्यालयाची 'पैरा' एकांकिका सादर होणार आहेत. सायंकाळी ५ वाजता कुलगुरू प्रा. राजनीश कामत यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे. मानाचा करंडक कोण पटकावणार, याची नाट्यप्रेमींमध्ये उत्सुकता आहे.

३
एकांकिकांच्या सादरीकरणानंतर आज करंडक कोण पटकावणार, याची उत्सुकता आहे.

0 1 NOV 2026

पुढारी

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Tender ID - 2026_SUK_1349159_1
2026_SUK_1349195_1

शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा दीक्षांत समारंभ दि.२७ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्याचे विद्यापीठाचे नियोजन असुन सदर दीक्षांत समारंभासाठी मुख्य मंडप, मिरवणुक मार्ग मंडप, खुर्च्या पुरविणे तसेच ग्रंथ प्रदर्शनासाठी स्टॉल उभारणे व इतर साहित्य पुरविणे इ. कामांसाठी अनुभवी कंत्राटदारांकडून जाहीर ई–निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा अर्ज, नियम व अटी हया महाराष्ट्र शासनाच्या "https://mahatenders.gov.in" संकेतस्थळावर उपलब्ध होतील. कोणत्याही निविदा मंजूर/नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. दीक्षांत समारंभाची तारीख व वेळ निश्चित होताच संबंधित ठेकेदारांना दुरध्वनीव्दारे/भ्रमणध्वनीव्दारे कळविण्यात येईल. तसेच यापुर्वी विद्यापीठामध्ये अशा स्वरूपाचे असमाधानकारक काम केलेल्या कंत्राटदारांची दरपत्रके नामंजूर करण्यात येईल.

शिवाजी वि./अभियांत्रिकी/
दि.०१/११/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

01 NOV 2026

सकाळ

"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Tender ID - 2026_SUK_1349159_1
2026_SUK_1349195_1

शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा दीक्षांत समारंभ दि.२७ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्याचे विद्यापीठाचे नियोजन असुन सदर दीक्षांत समारंभासाठी मुख्य मंडप, मिरवणुक मार्ग मंडप, खुर्च्या पुरविणे तसेच ग्रंथ प्रदर्शनासाठी स्टॉल उभारणे व इतर साहित्य पुरविणे इ. कामांसाठी अनुभवी कंत्राटदारांकडून जाहीर ई–निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा अर्ज, नियम व अटी हया महाराष्ट्र शासनाच्या "https://mahatenders.gov.in" संकेतस्थळावर उपलब्ध होतील. कोणत्याही निविदा मंजूर/नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. दीक्षांत समारंभाची तारीख व वेळ निश्चित होताच संबंधित ठेकेदारांना दुरध्वनीव्दारे/भ्रमणध्वनीव्दारे कळविण्यात येईल. **तसेच यापुर्वी विद्यापीठामध्ये अशा स्वरूपाचे असमाधानकारक काम केलेल्या कंत्राटदारांची दरपत्रके नामंजूर करण्यात येईल.**

शिवाजी वि./अभियांत्रिकी/
दि.०१/११/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव